टाइम्स
27/11/14

# आजीवन अध्ययन विभागाचा विस्तार समाजाभिमुख होण्याची गरज :प्रा.कुणाल जाधव

दोडामार्ग, २६ नोव्हेंबर (वार्ताहर)- विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा व्याप वाढत असून १८५०० विद्यार्थ्यांसह २०१ महाविद्यालये या विभागात सहभागी झाले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात ७२९ महाविद्यालये असून अजूनही या विभागाच्या विस्तारास भरपूर वाव आहे. आयुष्यभर शिक्षण घेत असताना या शिक्षणाचा उपयोग समाजातील तळागाळातील घटकांपर्यत पोहोचणे आवश्यक असून त्यादृष्टीने सदर विभाग कार्यरत असल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्यक्ष व विस्तार विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.कुणाल जाधव यांनी केले.ते येथील लक्ष्मीबाई ,हळबे महाविद्यालयात आयोजीलेल्या सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व महाविद्यालयांच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या द्वितीय सत्रातील प्रशिक्षण शिबीरात प्रमुख म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील होते.

यावेळी व्यासपीठावर प्रा.डॉ.कुणाल जाधवसह क्षेत्र समन्वयक प्राचार्य यशोधन गवस,प्रा.अरुण पणदुरकर, प्रा.डॉ.आर.एस.इंगळे आदी उपस्थित होते. प्रारंभी दिप प्रज्वलन व सरस्वतीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन या प्रशिक्षण शिबीरचा शुभारंभ करण्यात आला.

अध्यक्ष स्थानावरुन बोलताना प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील यांनी दोडामार्गची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगून आजीवन अध्ययन विभागाची वाटचाल प्रभावीपणे होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.प्रा.पणदुरकर यांनी शिक्षणाचा समाजासाठी सातत्याने वापर होण्याची गरज प्रतिपादित केली तर प्राचार्य गवस यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला.

यावेळी प्रा.डॉ.जाधव यांचा प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्यानंतर दुसऱ्या सत्रात प्रा. यशोधन गवस, प्रा.एम.ए.ठाकुर, प्रा.राजेंद्र मुंबरकर, प्रा.एन.एस.पाटील प्रा.भेंकी आदी विविध महाविद्यालयातील विस्तार शिक्षकांनी मार्गदर्शन केले व सदर विभाग आणखी कार्यरत होण्यासाठी विचार मांडले.

प्रारंभी प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.इंगळे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.डॉ.बेग यांनी केले.या शिबीरात सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व २४ वरीष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी व्यवस्थापक, विस्तार शिक्षक व क्षेत्र समन्वयकांनी सहभाग घेतला. शिबीराचे आयोजन हळबे महाविद्यालयाने नीटनेटके केल्याबद्दल सर्वच उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.